
इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक ३०९ । बुधवार, दि. १६ जुलै २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

# देशदूत

शिल्पकार विकासाचा...









# शुभांशू पृथ्वीवर

## कॅलिफोर्नियाच्या समुद्रकिनारी सुखरूप उतरले

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामध्ये वास्तव्य करणारे पहिले भारतीय ठरलेले अंतराळवीर शुभांशू शुक्ला हे १७ दिवसांच्या मोहिमेनंतर सुखरूपपणे पृथ्वीवर परतले आहेत.

सर्व अंतराळवीरांना यानातून सुखरूपपणे बाहेर आल्यानंतर वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यांना सुमारे १० दिवस क्वारंटाईनमध्ये ठेवले जाईल. यादरम्यान, त्यांच्या प्रकृतीवर बारीक लक्ष ठेवण्यात येणार आहे.

'ड्रॅगन' या यानाला पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना प्रचंड घर्षणाचा सामना करावा लागला. त्यामुळे आगीसारखी स्थिती निर्माण होऊन तापमान १६०० ते २००० डिग्री एवढे प्रचंड वाढले. मात्र तरीही हे यान आणि आतील अंतराळवीर सुरक्षितरीत्या पृथ्वीवर पोहोचले.

" कॅप्टन शुभांशू शुक्ला यांचे मी राष्ट्रासोबत स्वागत करतो. या मोहिमेत त्यांनी त्यांच्या समर्पण, धैर्य आणि अग्रगण्य भावनेद्वारे अब्जावधी स्वप्नांना प्रेरणा दिली आहे. हे आपल्या अंतराळ उड्डाण मोहीम गगनयानच्या दिशेने आणखी एक मैलाचा दगड आहे.

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

## संपादकीय

### अति तेथे माती...

देशातील जनतेला साखर आणि तेलाच्या सेवनाचे योग्य प्रमाण सांगायचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. समोसा, वडापाव, भजी, लाडू, जिलेबी आदींसह सर्व तऱ्हेच्या चटपटीत जंकफूडचा आस्वाद घेणाऱ्या खवय्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. आरोग्याला घटक असूनही जंकफूडची चटक लोकांना लागली आहे. केवळ बाहेरचे खाद्यपदार्थच नव्हे तर कोणतीही गोष्ट अति झाली की त्याची माती झाल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच भारतातील प्राचीन वैद्यकीय उपचार पद्धती असलेल्या आयुर्वेदात आहार आणि विहारावर सखोल विचार केल्याचे दिसून येते. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक घातकच ठरतो. सर्वांना ते चांगले ठाऊक आहे, पण खवय्येगिरीपुढे त्याचा विसर बहुतेकांना पडत चालला असावा. त्यामुळेच असे खाणे-पिणे मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार आणि प्रसंगी कर्करोगासारख्या दीर्घकालीन व्याधींचे प्रमुख कारण ठरत आहे. अशा पदार्थांच्या अतिसेवनाने प्रमाणापेक्षा जास्त तेल आणि साखर पोटात जाते. त्यामुळे चरबीचे प्रमाण वाढत जाते. खाद्यतेलाचा अतिवापर टाळण्यासाठी पुनर्वापर आहारशास्त्र निषिद्धच मानते. काही दशकांपूर्वी पन्नाशीनंतर आढळणारे अनेक आजार माणसांना आजकाल तरुण वयातच ग्रासत आहेत. त्या धोक्यांबाबत वैद्यकीय तज्ज्ञ वारंवार लक्ष वेधून घेतात. तरीही म्हणावी तितकी जागरुकता समाजात अजूनही आलेली नाही. त्यात आता केंद्र सरकारच्या नव्या इशाऱ्याची भर पडली आहे. तेलकट-गोड पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत धोक्याचा इशारा देणारे फलक सध्या केंद्र सरकारच्या सर्व कार्यालयांतील उपाहारगृहांत लावले जातील. पुढे तसे फलक लावण्याची सक्ती कदाचित सर्वत्र केली जाईल. यामागे सरकारचा हेतू जनहिताचा वाटत असला तरी पुढे जाऊन फलक न लावणाऱ्या उपाहारगृहांवर कारवाईचा दंडुका सरकारी बाबूलोक उगारतील. त्यातून 'खाण्याचा' नवा मार्ग शोधला जाणार तर नाही ना? तेलकट आणि गोड पदार्थांच्या सेवनातून होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत नुसता इशारा देऊन भागणार नाही; तर त्याबाबत जागरुकताही

पान १० वर

# बिनपगारी फुल्ल अधिकारी : जलसंधारणचे ६७० अधिकारी वाऱ्यावर!

**नाशिक । नरेंद्र जोशी**

सरकारी काम आणि सहा महिने थांब या म्हणीचा प्रत्यय सध्या जलसंधारण अधिकाऱ्यांना येत आहे. तब्बल ६७० जलसंधारण अधिकाऱ्यांच्या पगाराची कोणतीही तरतूद नसल्याने पाच महिन्यांपासून त्यांचे संसार वाऱ्यावर आहेत. अधिकारी या गोष्टीला वैतागले असून कधी एकदा पगार होतात, याची वाट पाहत आहेत.

गेल्या १३ फेब्रुवारी रोजी राज्यातील ६७० जलसंधारण अधिकारी यांना मृदा व जलसंधारण विभागामार्फत राज्यातील सर्वोच्च साहेबांच्या हस्ते नियुक्ती पत्र दिले. मात्र पाच महिने झाले तरी या अधिकाऱ्यांच्या पगाराची तरतूद न केल्याने ते बिनपगारी फुल्ल अधिकारी म्हणून काम करत आहेत.

गेल्या मार्च महिन्यात राज्य शासनाने राज्यातील ६७० जणांना जलसंधारण अधिकारी गट-ब (अराजपत्रित)पदी नियुक्ती दिली. त्यानंतर जसा सर्वांचा दरमहा पगार होतो तसा आपलाही होईल ही आशा या अधिकाऱ्यांना होती. मात्र तो पहिला पगार पाहण्याचे भाग्य अजून या अधिकाऱ्यांच्या नशिबी आलेले नाही. कारण यांचा पगार काढण्याचे काम संभाजीनगरमधील वाल्मी ही संस्था करते. मात्र त्यांनी अद्याप तरतूदच केलेली नाही. नाशिकमध्ये असे १८ जलसंधारण अधिकारी पगाराच्या प्रतीक्षेत आहेत. जलसंधारण अधिकाऱ्यांकडून वारंवार पगारासंबंधी वाल्मी सोबत पत्रव्यवहार करूनदेखील कुठलेच ठोस पाऊल उचलले गेले नाही. यापूर्वी वेतन कुठल्या लेखाशीर्षतून करावे याबद्दल स्पष्टता नसल्यामुळे पगार होत नाही, असे कारण वाल्मीकडून सांगण्यात येत होते. पण १२ जून २०२५ रोजी पत्राद्वारे शासनाने त्यासंबंधी मार्गदर्शन केल्यानंतरदेखील अधिकाऱ्यांचे पगार होत नाहीत. शासनाचे मार्गदर्शन मिळूनही पगार होत नसतील तर आणखी कोणाचे मार्गदर्शन हवे, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

# जयंत पाटील अखेर पायउतार

## शशिकांत शिंदे शरद पवार गटाचे नवे प्रदेशाध्यक्ष

**मुंबई । दि.१५ प्रतिनिधी**

जवळपास सात वर्षांपासून सुरुवातीला एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेस आणि नंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाची धुरा वाहणारे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांचा प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा मंगळवारी अखेर मंजूर करण्यात आला. त्यानंतर विधान परिषद सदस्य आणि माजी मंत्री शशिकांत शिंदे यांची नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून होती. मात्र राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी राजीनाम्याचे वृत्त फेटाळून लावले होते. स्वतः जयंत पाटील यांनी सोमवारी प्रसार माध्यमांशी बोलताना आपण अजूनही प्रदेशाध्यक्ष असल्याचे स्पष्ट करताना भाजप प्रवेशाच्या बातम्या फेटाळल्या होत्या. मात्र राष्ट्रवादीच्या प्रदेश नेतृत्वात बदल होणार आणि शरद पवार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी भाकरी फिरवणार अशी चर्चा सुरू होती आणि ती अखेर आज खरी ठरली. शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्षाच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये झालेल्या बैठकीत शशिकांत

पान १० वर



" एका माथाडी कामगाराचा मुलगा आपल्या पक्षाचे नेतृत्व करणार असल्याचा विशेष आनंद आहे. शशिकांत शिंदे यांचे नेतृत्व माथाडी कामगारातून उभे राहिले आहे. जयंत पाटील यांनी अडचणीच्या काळात साथ दिली. सात वर्षे पक्षाचे नेतृत्व केले. अहोरात्र कष्ट केले.

■ **शरद पवार**, पक्षाध्यक्ष

" शरद पवार यांनी मोठी जबाबदारी टाकली आहे. मिळालेल्या संधीचे शंभर टक्के सोनं करण्याचा मी प्रयत्न करेन.

■ **शशिकांत शिंदे**, नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष

" हा शेवट नाही तर एका नव्या पर्वाची सुरुवात आहे.

■ **जयंत पाटील**, मावळते प्रदेशाध्यक्ष

## पीकविमा कंपन्यांची नफेखोरी : कोकाटे

**मुंबई । दि.१५ प्रतिनिधी**

राज्यातील पीकविमा योजनेत आतापर्यंत ५० टक्के ट्रिगर हे फक्त पीक कापणी प्रयोगावर आधारित होते. उर्वरित ट्रिगर्स एनडीआरएफ आणि एसडीआरएफ यंत्रणांद्वारे नुकसान भरपाईसाठी वापरले जात होते. मात्र, अनेक विमा कंपन्या आणि काही सीएससी सेंटरमार्फत गैरप्रकार झाल्याचे आढळले. विमा कंपन्यांनी तब्बल १० हजार कोटींचा नफा कमावल्याची माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी मंगळवारी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

भाजपचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी आज विधान परिषदेत शेतकरी पीक विम्याबाबत प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना कोकाटे म्हणाले, राज्य सरकारने जुन्या पीकविमा योजनेत सुधारणा करत नवीन पीकविमा योजना लागू केली आहे. जुन्या योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार उघडकीस आल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

पंजाब, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, नागालँड या राज्यांनी पीकविमा योजना राबवली नाही. तर बिहार, पश्चिम बंगाल, गुजरात, झारखंड, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि जम्मू-काश्मीर या राज्यांनी योजना बंद केली आहे. झारखंडने पुन्हा एक रुपयात योजना सुरू केली. पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांना भरपाई मिळाली नाही, अशी माहिती कोकाटे यांनी दिली.

# पीकविमा तक्रारींचे पुनरावलोकन

## कृषी राज्यमंत्र्यांची विधानसभेत माहिती

**मुंबई । दि.१५ प्रतिनिधी**

पीकविमा संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारींचे पुनरावलोकन करून शेतकऱ्यांना विमा मदतीसाठी पात्र ठरवण्याचा योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील, असे कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी मंगळवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

भाजपचे आमदार डॉ. राहुल आहेर यांनी नाशिक जिल्ह्यातील चांदवड आणि देवळा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पीकविमासंदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना अ‍ॅड. जयस्वाल यांनी सांगितले, चांदवड तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी पंतप्रधान पीक विमा योजनेमध्ये सहभाग घेतला असून ज्यांची नुकसानीच्या पूर्व सूचना दिलेल्या आहेत, अशा सर्व शेतकऱ्यांचे नैसर्गिक आपत्ती अंतर्गत घेण्यात आलेले पंचनामे गृहीत धरून नुकसान भरपाई देण्याबाबत पडताळणी करावी.

विमा कंपनीसोबत बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईच्या दाव्यांबाबत नियमानुसार तपासणी करावी. नाशिक जिल्ह्यातील रब्बी हंगामातील

पान १० वर



# हिरे पिता-पुत्रांचा अटकपूर्व जामीन अर्ज नाकारला

**मालेगाव । दि. १५ प्रतिनिधी**

बनावट कर्ज खाते तयार करत उपशिक्षकाच्या नावावर १४ लाखांचे कर्ज त्याची बनावट स्वाक्षरी करत काढल्याप्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात माजी मंत्री प्रशांत हिरे, माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे व अद्वय हिरे यांनी येथील अप्पर जिल्हा सत्र न्यायालयात दाखल केलेला अटकपूर्व जामीन नामंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती अ‍ॅड. वासिफ शेख यांनी दिली.

कॅम्प भागात वास्तव्यास असलेल्या व सुरगाणा येथील नूतन विद्यामंदिरात उपशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या विलास दिगंबर पगार यांनी १ जुलै रोजी कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करत संस्था व व्यंकटेश को-ऑप. बँकेच्या पदाचा गैरवापर करत बँकेतून आपल्या नावावर सात लाखांचे कर्ज असताना दुसरे बनावट कर्ज खाते करत १४ लाखांचे कर्ज बनावट स्वाक्षरीद्वारे काढण्यात आले. या संदर्भात उपनिबंधकांकडे तक्रार केल्यानंतर ते कर्ज एकरकमी खात्यात भरण्यात आले. आपल्या

पान १० वर

## जीप दरीत कोसळली; आठ प्रवासी ठार

**पिथोरागड । वृत्तसंस्था**

उत्तराखंडच्या पिथोरागडमध्ये एक जीप नदीत कोसळल्याने आठ जणांचा जागीच मृत्यू झाला तर पाच जण गंभीर जखमी आहेत. एकूण १३ प्रवाशांनी भरलेली मॅक्स जीप मुवानीहून बोक्ता गावाकडे जात असताना हा अपघात झाला. जीप अचानक नियंत्रणाबाहेर गेली आणि १५० मीटर खोल नदीत कोसळली. घटनेची माहिती मिळताच बचाव कार्य सुरू करण्यात आले आणि जखमींना दरीतून बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृतांमध्ये एका शाळकरी मुलीसह चार महिलांचा समावेश आहे.

# स्मार्ट सिटीचे स्वप्न भंगले!

## विकासाऐवजी केवळ प्रश्नचिन्ह; नाशिककरांच्या संयमाची कसोटी

**नाशिक । रवींद्र केडिया**

देशातील शहरे 'स्मार्ट' बनवण्याच्या केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'स्मार्ट सिटी' योजनेअंतर्गत नाशिकचा समावेश करण्यात आला असला तरी गेल्या पाच-सहा वर्षांपासून चाललेला 'स्मार्ट' कारभार नाशिककरांच्या संयमाची कसोटी घेत आहे.

या योजनेची मूळ मुदत केवळ दोन वर्षांची होती, मात्र त्यांना मिळालेल्या सततच्या मुदतवाढीनंतरही अनेक प्रकल्प आजही अपूर्ण, रखडलेले किंवा हस्तांतरणाच्या प्रतीक्षेत आहेत. स्मार्ट सिटीअंतर्गत सुरू असलेली कामे अपूर्ण आणि नियोजनशून्य असल्याने सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

अपूर्ण प्रकल्पांच्या मालिकेत यांत्रिकी गेट प्रकल्प अद्याप अर्धवट स्थितीत, उपयोगात नाही. गोदापार्क उद्यान पूर्ण झाले असले तरी अजून महापालिकेला हस्तांतरित झालेले नाही. स्काडा मीटर प्रणाली ८५ टक्के काम पूर्ण झाल्याचे सांगितले जात आहे, मात्र अद्यापही प्रणाली अपुरीच आहे. साडेसात हजार स्मार्ट मीटर बसवण्याचे लक्ष्य असून आजपर्यंत केवळ सात हजार मीटर बसवण्यात आले आहेत. चार जलकुंभांचे कनेक्शन जोडणी अजूनही प्रलंबित आहे. कामे उशिराने पूर्ण होत असल्याने, जबाबदार ठेकेदारांवर काय कारवाई होणार? याचा खुलासा अजूनही झालेला नाही.

### सिंहस्थासंदर्भातील गोंधळ

आगामी त्र्यंबकेश्वर सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर स्मार्ट सिटीने प्राधिकरणाचे अधिकार मागितले होते. मात्र सरकारने स्वतंत्र प्राधिकरण स्थापन केले आणि स्मार्ट सिटीकडे फक्त सीसीटीव्ही प्रणालीची जबाबदारी सोपवली. याअंतर्गत नाशिक शहरात सीसीटीव्ही बसवण्याचे काम सुरू आहे. पण याच स्मार्ट सिटीअंतर्गत यापूर्वीही सीसीटीव्ही प्रकल्प अर्धवट, रखडलेला ठरला आहे, त्यामुळे ही प्रणाली वेळेत पूर्ण होणार का? याबद्दलही शंका व्यक्त केली जात आहे.

### स्मार्ट की स्लो सिटी?

स्मार्ट सिटी योजनेत नागरिकांना पारदर्शक व जलद सेवा मिळण्याचा दावा करण्यात आला होता. प्रत्यक्षात मात्र योजनांची अंमलबजावणी ही उशीर, अनियोजन आणि अपूर्णतेने ग्रासलेली आहे. प्रकल्पांच्या विलंबाबाबत कोणतीही ठोस कार्यवाही, ठेकेदारांवर दंड अथवा जबाबदारी निश्चित न केल्यामुळे प्रशासनाच्या नियोजन क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# आरोपीवर प्रौढ म्हणून खटल्याची मागणी फेटाळली

## बाल न्याय मंडळाचा पोलिसांना धक्का

**पुणे । दि.१५ प्रतिनिधी**

**पोर्शे कार अपघात**

पुण्यातील कल्याणीनगर येथे गेल्यावर्षी १९ मे रोजी झालेल्या भीषण पोर्शे कार अपघातातील १७ वर्षीय अल्पवयीन आरोपीवर प्रौढ म्हणून खटला चालवण्याची पुणे पोलिसांची मागणी बाल न्याय मंडळाने मंगळवारी फेटाळून लावली. यामुळे पुणे पोलिसांना मोठा धक्का बसला असून, या प्रकरणातील अल्पवयीन आरोपीला मोठा दिलासा मिळाला आहे. बाल न्याय मंडळाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला देत, अल्पवयीन मुलावर झालेला गुन्हा बाल न्याय कायद्याच्या अर्थानुसार घृणास्पद गुन्ह्याच्या कक्षेत येत नाही, असे निरीक्षण नोंदवले आहे.

१९ मे २०२४ रोजी पहाटे अडीचच्या सुमारास पुण्यातील कल्याणीनगर परिसरात १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने त्याच्या भरधाव पोर्शे टायकन कारने दुचाकीस्वार दोन आयटी अभियंत्यांना धडक दिली होती.

**तापमान**

| | | |
|---|---|---|
| किमान | : | २२.२° |
| कमाल | : | २९.१° |